# जिमखाना अहवाल २०२४-२०२५ - वरिष्ठ विभाग

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाची अखिल भारतीय अंतर विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी उच्चतम झाली. सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे आपल्या महाविद्यालयातील **कु. कस्तुरी दीपक सावेकर** हिला महाराष्ट्र शासनाच्या वतीने साहसी क्रीडा प्रकारामध्ये **व मानसिंग पाटील** यास जलतरण मधील उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून **शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार** जाहीर झाले.

- चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्विमिंग स्पर्धेत **पृथ्वीराज डांगे** याने व्ययक्तिक १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये **रौप्य पदक** व साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ स्पर्धेत **कास्य पदक** पटकाविले. तसेच उतराखंड येथील नॅशनल गेम्स स्पर्धेत रिले मध्ये कास्य पदक पटकावले.
- चंदीगड, पंजाब येथे झालेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ कायकिंग स्पर्धेत **कु. धनश्री धोकटे** हिने सांघिक मध्ये **कास्य पदक** पटकाविले.
- भोपाळ, मध्य प्रदेश येथे झालेल्या साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत **कु. समीक्षा शेलार** हिने ७० किलो वजनी गटात **रौप्य पदक** पटकावले

याच बरोबर अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत महाविद्यालयाच्या एकूण ४६ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला व खेलो इंडिया इंटर यूनिवर्सिटी स्पर्धेत ८ खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

महाविद्यालयाने मुले व मुली असे एकूण ५ सांघिक खेळांमध्ये सहभाग नोंदविला व शिवाजी विद्यापीठ विभागीय स्पर्धेत १ विजेतेपद, २ उपविजेतेपद व १ तृतीय क्रमांक मिळविले त्याच प्रमाणे शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धांमध्ये २ विजेतेपद व १ उपविजेतेपद व १ तृतीय क्रमांक मिळविला. यामध्ये क्रिकेट महिला अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत विजेता, फूटबॉल पुरुष अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक, सॉफ्ट बॉल पुरुष अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत विजेता, ताईकोंदो महिला अंतर विभागीय उपविजेता तसेच हॉकी महिला अंतर विभागीय स्पर्धेत उपविजेता ठरला. त्याच प्रमाणे खुल्या राज्य व राष्ट्रीय स्पर्धेतही महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी केली आहे.

**शासकीय सेवेत विविध पदावर निवड झालेले खेळाडू :**

१. स्वप्नील पाटील (पॅरा स्विमिंग) – महाराष्ट्र शासन – मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी (राज्य पत्रित)
२. सोनल सावंत (पॉवर लिफ्टिंग) – महाराष्ट्र शासन – क्रीडा कार्यकारी अधिकारी (राज्य पत्रित)
३. स्वरूप उन्हाळकर (पॅरा शूटिंग) – महाराष्ट्र शासन – क्रीडा विकास अधिकारी
४. अजिंक्य चौगुले (पॉवर लिफ्टिंग) – महाराष्ट्र शासन – क्रीडा विकास अधिकारी
५. ओंकार पाटील (फूटबॉल) – मुंबई पोलिस – कॉन्स्टेबल
६. यश देवणे (फूटबॉल) – मुंबई पोलिस – कॉन्स्टेबल
७. विशाल पाटील (हॉकी) – मुंबई पोलिस – कॉन्स्टेबल

## राष्ट्रीय व अंतर विद्यापीठ प्रावीण्य प्राप्त खेळाडू :

**१)** पृथ्वीराज डांगे (स्विमिंग)

- चेन्नई येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक **कास्य पदक**
- चेन्नई येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत१०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक **कास्य पदक**
- उत्तराखंड येथील ३८ व्या नॅशनल गेम्स स्पर्धेत रिले मध्ये **कास्य पदक**
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ५ सुवर्ण, २ रौप्य व १ कास्य पदक
- शिवाजी विद्यापीठ विभागीय ५ सुवर्ण, २ रौप्य व १ कास्य पदक

**२)** कु. धनश्री धोकटे (कायकिंग)

- चंदिगड येथे झालेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ कायकिंग (K2) स्पर्धेत **कास्य पदक**
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत रौप्य पदक

**३)** कु. समीक्षा शेलार (ज्युदो व कुस्ती)

- अमृतसर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत सहभाग
- भोपाल, मध्यप्रदेश येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत **रौप्य पदक**
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ज्युदो स्पर्धेत सुवर्ण पदक

**४)** कु. सरिता सावंत (पॉवर लिफ्टिंग व वेट लिफ्टिंग)

- श्रीनगर, काश्मीर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- धर्मशाळा, हिमाचल प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ वेट लिफ्टिंग स्पर्धेत **आठवा क्रमांक**
- -------------------------- येथील खेलो इंडिया अंतर विद्यापीठ वेट लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- गुंटूर, आंध्र प्रदेश येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ वेट लिफ्टिंग स्पर्धेत चतुर्थ क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय पॉवर लिफ्टिंग व वेट लिफ्टिंग स्पर्धेत सुवर्ण पदक

**५)** कु. साक्षी सांदूगडे (पॉवर लिफ्टिंग व वेट लिफ्टिंग)

- श्रीनगर, काश्मीर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- धर्मशाळा, हिमाचल प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ वेट लिफ्टिंग स्पर्धेत सहभाग
- गुंटूर, आंध्र प्रदेश येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ वेट लिफ्टिंग स्पर्धेत **सातवा क्रमांक**
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय पॉवर लिफ्टिंग व वेट लिफ्टिंग स्पर्धेत सुवर्ण पदक

**६)** बाबासो कांबळे (पॉवर लिफ्टिंग)

- श्रीनगर, काश्मीर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**७)** सुमित जाधव (पॉवर लिफ्टिंग)

- श्रीनगर, काश्मीर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**८)** यश आडनाईक (पॉवर लिफ्टिंग)

- श्रीनगर, काश्मीर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**९)** प्रतीक तावडे (पॉवर लिफ्टिंग)

- श्रीनगर, काश्मीर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**१०)** हर्षद पाटील (पॉवर लिफ्टिंग)

- श्रीनगर, काश्मीर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**११)** सुहास सावंत (पॉवर लिफ्टिंग)

- श्रीनगर, काश्मीर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत कास्य पदक

१२) कु. फिजा देसाई (शूटिंग)

- कुरुक्षेत्र येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ १० मीटर एयर पिस्टल स्पर्धेत सहभाग
- फरीदाबाद येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ २५ मीटर स्पोर्ट्स पिस्टल स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय १० मीटर एयर पिस्टल प्रथम क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय २५ मीटर स्पोर्ट्स पिस्टल द्वितीय क्रमांक

१३) श्रीकांत कामांना (कुस्ती)

- भटिंडा, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक
- संभाजीनगर येथील खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्ण पदक

१४) कु. सौम्यलता बिराजदार (क्रिकेट)

- चेन्नई येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेस निवड
- उदयपुर, राजस्थान येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- २३ वर्षा खालील राष्ट्रीय स्पर्धांसाठी महाराष्ट्र संघात निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय प्रथम व विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

१५) कु. सिद्धि चव्हाण (क्रिकेट)

- चेन्नई येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेस निवड
- उदयपुर, राजस्थान येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय प्रथम व विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

१६) प्रभू पवार (फूटबॉल)

- कानपुर, उत्तर प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेस निवड
- वडोदरा, गुजरात येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत तृतीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

१७) यश देवणे (फूटबॉल)

- कानपुर, उत्तर प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेस निवड
- वडोदरा, गुजरात येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत तृतीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

१८) शोएब बागवान (फूटबॉल)

- कानपुर, उत्तर प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेस निवड
- वडोदरा, गुजरात येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत तृतीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

१९) रोहित पवार (फूटबॉल)

- कानपुर, उत्तर प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेस निवड
- वडोदरा, गुजरात येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत तृतीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

२०) गुरुराज काटकर (फूटबॉल)

- कानपुर, उत्तर प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेस निवड
- वडोदरा, गुजरात येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत तृतीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

२१) कु. पूर्वा पाटील (हॉकी)

- जयपूर, राजस्थान येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

२२) कु. हर्षदा लाड (हॉकी)

- जयपूर, राजस्थान येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

२३) कु. दिपाली पाटील (हॉकी)

- जयपूर, राजस्थान येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

२४) कु. सूर्यजा हांडे (हॉकी)

- जयपूर, राजस्थान येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

२५) कु. सानिका मोरे (फेन्सिंग)

- जम्मू, काश्मीर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत रौप्य पदक

२६) आदित्य जाधव (बॉक्सिंग)

- भटिंडा, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

२७) संदेश काटकर (बॉक्सिंग)

- भटिंडा, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

२८) प्रणव रोडे (बॉक्सिंग)

- भटिंडा, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

२९) राज पाटील (बॉक्सिंग)

- भटिंडा, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

३०) तन्मय कळंत्रे (बॉक्सिंग)

- भटिंडा, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**३१)** ओम हिरूर (बॉक्सिंग)

- भटिंडा, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**३२)** कु. गायत्री भड (बॉक्सिंग)

- भटिंडा, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय भाला फेक तृतीय व विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**३३)** ऋषिकेश काशीद (वेट लिफ्टिंग)

- चंदिगड, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- गुंटूर, आंध्र प्रदेश येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सोळावा क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**३४)** प्रणव कांबळे (बेस्ट फिजिक)

- अर्नाकुलम, केरळ येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**३५)** ओंकार मिसाळ (बेस्ट फिजिक)

- अर्नाकुलम, केरळ येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**३६)** कुणाल दरवान (मल्लखांब)

- भोपाल, मध्य प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**३७)** कु. स्नेहल खवरे (मल्लखांब)

- भोपाल, मध्य प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

**३८)** सुमित कांबळे (ज्युदो)

- भोपाल, मध्य प्रदेश येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ज्युदो स्पर्धेत सुवर्ण पदक

**३९)** कु. राजश्री सुतार (तायक्वोंदो)

- अमृतसर, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**४०)** विक्रांत माने (सॉफ्टबॉल)

- नेल्लोर, आंध्र प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ विभागीय व अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**४१)** आकाश कदम (सॉफ्टबॉल)

- नेल्लोर, आंध्र प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ विभागीय व अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**४२)** अभिषेक संकपाळ (सॉफ्टबॉल)

- नेल्लोर, आंध्र प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ विभागीय व अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**४३)** आदिराज पाटील (सॉफ्टबॉल)

- नेल्लोर, आंध्र प्रदेश येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ विभागीय व अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**४४)** यशराज कांबळे (फूटबॉल)

- 'संतोष ट्रॉफी' राष्ट्रीय फूटबॉल स्पर्धेस महाराष्ट्र संघात निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

**४५)** कु. प्रणाली पाटील (तायक्वोंदो)

- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक
- पुणे येथील राष्ट्रीय तायक्वोंदो स्पर्धेत सुवर्ण पदक

**४६)** कु. श्रद्धा कुंभार (कुस्ती व ज्युदो)

- संभाजीनगर येथील खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कास्य पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत कास्य पदक
- वाठार येथील कुस्ती स्पर्धेत वाठार केसरी मानाची गदा विजेती

डॉ. प्रशांत बी. पाटील
क्रीडा विभाग प्रमुख (वरिष्ठ)

## शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागातील विविध उपक्रम :

**१) १५ दिवासीय योग शिबीर २०२४**

महाविद्यालयाच्या क्रीडा व एन.सी.सी. विभाग आणि योग विद्या धाम यांच्या संयुक्त विद्यमाने MoU अंतर्गत दिनांक ०५ ते २० जून २०२४ अखेर अंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त १५ दिवासीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास आर्ट ऑफ लिविंगचे योग प्रशिक्षक प्रा. रणजीत पाटील यांनी योग आसन प्रात्यक्षिकसह त्याचे शरीराला होणारे फायदे विषद केले. या शिबिरास विद्यार्थी, खेळाडू व एन.सी.सी. कॅडेट उपस्थित होते. या शिबिराचे नियोजन कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील व प्रा. प्रशांत मोटे यांनी केले.

**२) अंतरराष्ट्रीय योग दिन २०२४**

महाविद्यालयाच्या क्रीडा व एन.सी.सी. विभाग आणि योग विद्या धाम यांच्या संयुक्त विद्यमाने MoU अंतर्गत दिनांक २१ जून २०२४ रोजी अंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या समारंभास मार्गदर्शक म्हणून प्रा. आर. एस. पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडनीकर हे होते. प्रा. आर. एस. पाटील यांनी योग आसनांसह त्याचे शरीराला होणारे फायदे विषद केले. या समारंभास सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील व प्रा. प्रशांत मोटे यांनी केले.

**३) पॅरिस ओलांपिक कास्य पदक विजेता स्वप्नील कुसाळे सत्कार समारंभ**

महाविद्यालयाच्या एनसीसी व क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय नेमबाज स्वप्नील कुसाळे यांनी पॅरिस ओलांपिक स्पर्धेमध्ये भारतासाठी कास्यपदक मिळविल्याबद्दल विजयी रॅलीचे आयोजन करण्यात आले. कोल्हापूर जिल्हा क्रीडा कार्यालय व विविध क्रीडा संघटना यांच्या वतीने या रॅली चे आयोजन करण्यात आले. यावेळी शहराच्या प्रमुख चौकातून विजयी रॅली द्वारे कावळा नाका ते दसरा चौक दरम्यानी रॅली काढण्यात आली. या वेळी महाविद्यालयाचे सर्व खेळाडू, एनसीसी कडेट्स व विद्यार्थी यांनी विजयी घोषणा देत रॅली मध्ये सहभाग नोंदविला.

**४) शालेय वेट लिफ्टिंग स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाचा क्रीडा विभाग व कोल्हापूर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या वतीने दिनांक २६ ऑगस्ट २०२४ रोजी १४, १७ व १९ वर्षाखालील शालेय वेट लिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या वेळी महानगर पालिका क्रीडा प्रमुख श्री. सचिन पांडव व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी शहरातील एकूण ५८ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील व प्रा. प्रशांत मोटे यांनी केले.

**५) अंतर महाविद्यालयीन चेस आणि कॅरम स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक २८ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित साधून अंतर महाविद्यालयीन चेस व कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत महाविद्यालयाच्या एकूण ५८ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या वेळी चेस व कॅरम खेळाबाबत नियम व माहिती देण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर, प्रबंधक श्री. रविंद्र भोसले व अधीक्षक श्री. मनीष भोसले यांच्या हस्ते स्पर्धेस सुरवात करण्यात आली. यास्पर्धेस शिक्षक, विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते. या स्पर्धेचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**६) भित्ति पत्रक प्रकाशन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी नुकत्याच पार पाडलेल्या पॅरिस ओलंपिक २०२४ स्पर्धेच्या अनुषंगाने क्रीडा दिनानिमित्त 'ओलंपिक व भारत' या विषयावर भित्ति पत्रक सादरीकरण करण्यात आले. या मध्ये महाविद्यालयातील खेळाडूंनी पॅरिस ओलंपिक २०२४ स्पर्धेमध्ये घडलेल्या सर्व घडामोडींचा आढावा घेणारे पोस्टर प्रदर्शित करण्यात आले. या भित्ति पत्रक प्रकाशन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे रयत शिक्षण संस्थेचे क्रीडा प्रमुख मा. प्रा. संभाजी पाटील सर व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी खेळाडूंनी ओलंपिक च्या सुरवती पासून आज पर्यंतच्या भारताच्या कामगिरीचा आढावा घेणारे पोस्टर तसेच ओलंपिक चिन्हाची कलाकृती तयार करण्यात आली. यावेळी शिक्षक, खेळाडू व विद्यार्थी उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील व प्रा. प्रशांत मोटे यांनी केले.

**७) राष्ट्रीय क्रीडा दिन २०२४ निमित्त व्याखान**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन निमित्य दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी 'ओलंपिक व भारत' या विषयावरील व्याखाणाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते रयत शिक्षण संस्थेचे क्रीडा प्रमुख मा. प्रा. संभाजी पाटील सर यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व्याख्याता मा. प्रा. संभाजी पाटील सर यांनी ओलंपिक खेळाची सुरवात ते भारताचा सहभाग व आज पर्यंतच्या भारताच्या ओलंपिक स्पर्धेतील कामगिरीचा इतिहास सर्वांसमोर मांडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर यांनी मेजर ध्यानचंद यांचे पासून आजच्या स्वप्नील कुसाळे पर्यन्त खेळाडूंचा प्रवास अगदी सखोलपने विषद केला. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**८) शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय टेनिस स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय टेनिस स्पर्धेचे आयोजन २२ ओक्टोंबर २०२४ रोजी शांतिंनिकेत स्कूल येथे करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ क्रीडा संचालक मा. डॉ. शरद बनसोडे व सर्व विद्यापीठ निवड समिति सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेसाठी सपूर्ण शिवाजी विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील एकूण ३२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यातूनच अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा महिला व पुरुष संघ निवडण्यात आला. या स्पर्धेचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**९) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय फूटबॉल पुरूष स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागच्या वतीने व कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषदेच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय फूटबॉल स्पर्धेचे आयोजन दिनांक १० ते १३ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन जेष्ठ फूटबॉल प्रशिक्षक मा. श्री. विश्वास मालेकर (कांबळे) सर व सी लाइसन फूटबॉल प्रशिक्षक मा. श्री. रविंद्र शेळके सर यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेसाठी सपूर्ण शिवाजी विद्यापीठ सलग्नीत कोल्हापूर विभागातून महाविद्यालयातील १८ संघातील एकूण २५८ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यातूनच शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेसाठी विजेत्या संघांची निवड करण्यात आली. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**१०) शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय शूटिंग स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय शूटिंग स्पर्धेचे आयोजन १६ व १७ नोव्हेबर २०२४ रोजी राजे संभाजी नेमबाजी प्रशिक्षण केद्र, दुधाळी मैदान येथे करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या अंतरराष्ट्रीय शूटिंग खेळाडू सौ. राधिका बराले हवालदार, कोल्हापूर मेन अँड विमेन रायफल असोसिएशनचे अध्यक्ष मा. श्री. अजित खराडे व सचिव श्री. रमेश कुसाळे व सर्व विद्यापीठ निवड समिति सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेसाठी सपूर्ण शिवाजी विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील एकूण ११६ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यातूनच अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा महिला व पुरुष संघ निवडण्यात आला. या स्पर्धेचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**११) शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय बॉक्सिंग स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन २५ व २६ नोव्हेबर २०२४ रोजी शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभाग हॉल येथे करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, शिवाजी विद्यापीठ क्रीडा संचालक मा. डॉ. शरद बनसोडे व सर्व विद्यापीठ निवड समिति सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेसाठी सपूर्ण शिवाजी विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील एकूण ७४ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यातूनच अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा महिला व पुरुष संघ निवडण्यात आला. या स्पर्धेचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**१२) शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन दिनांक १३ व १४ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन गुरुवर्य बिभिषण पाटील सर, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर, प्रबंधक श्री. रविंद्र भोसले, अधीक्षक श्री. मनीष भोसले व सर्व विद्यापीठ निवड समिति सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेसाठी सपूर्ण शिवाजी विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील एकूण ९२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यातूनच अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा महिला व पुरुष संघ निवडण्यात आला. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**१३) स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत बुद्धीबळ स्पर्धा**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत दिनांक २३ डिसेंबर २०२४ रोजी खेळ प्रचार व प्रसार होण्यासाठी संस्थेच्या सर्व शाखांतर्गत इयत्ते नुसार विविध गटात बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन आय.कयू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर, अधीक्षक श्री. मनीष भोसले सर यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या स्पर्धेमध्ये प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी व विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. विजेत्या स्पर्धकांना रोख परितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**१४) स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत रस्सी खेच स्पर्धा**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी पारंपारिक खेळ प्रचार व प्रसार होण्यासाठी संस्थेच्या सर्व शाखांतर्गत इयत्ते नुसार विविध गटात रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन अधीक्षक श्री. मनीष भोसले सर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व आय.कयू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या स्पर्धेमध्ये बालवाडी ते तृतीय वर्षातील प्रत्येक विभागातील एकूण १३ संघांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. विजेत्या स्पर्धकांना रोख परितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**१५) स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत बॉडी बिल्डिंग स्पर्धा**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी संस्थेच्या सर्व शाखांतर्गत बॉडी बिल्डिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार विजेते अंतर राष्ट्रीय खेळाडू विजय मोरे, प्रबंधक श्री. रविंद्र भोसले, अधीक्षक श्री. मनीष भोसले हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले. या वेळी आय.कयू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर, प्रा. डॉ. डी. के. वाळवी व इतर मान्यवर उपस्थितीत होते. या स्पर्धेमध्ये एकूण १२ खेळाडूंनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. विजेत्या स्पर्धकांना मानाचा चषक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**१६) बी.सी.ए. विभाग अंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या बी.सी.ए. विभाग व क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी अंतर विभागीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या मध्ये क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, खो-खो व रस्सीखेच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत महाविद्यालयाच्या बी.सी.ए. विभागातील एकूण १४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या वेळी आय.कयू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर, अधीक्षक श्री. मनीष भोसले, बी.सी.ए. विभाग प्रमुख प्रा. शरयू शेवडे व सर्व शिक्षक यांच्या हस्ते स्पर्धेस सुरवात करण्यात आली. या स्पर्धेचे मैदान आखणी, पंच कमिटी व इतर तांत्रिक सुविधांचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**१७) कॉमर्स अँड मॅनेजमेंट विभाग अंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या कॉमर्स अँड मॅनेजमेंट विभाग व क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५ रोजी अंतर विभागीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या मध्ये क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, खो-खो व रस्सीखेच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत महाविद्यालयाच्या कॉमर्स अँड मॅनेजमेंट विभागातील एकूण १३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर, आय.कयू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर, प्रबंधक श्री. रविंद्र भोसले, अधीक्षक श्री. मनीष भोसले, कॉमर्स अँड मॅनेजमेंट विभाग प्रमुख प्रा. संतोष कांबळे व सर्व शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेचे मैदान आखणी, पंच कमिटी व इतर तांत्रिक सुविधांचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**१८) सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभाग अंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभाग व क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी अंतर विभागीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या मध्ये क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, खो-खो व रस्सीखेच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत महाविद्यालयाच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील एकूण ७८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर, आय.कयू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर, प्रबंधक श्री. रविंद्र

भोसले, अधीक्षक श्री. मनीष भोसले, सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभाग प्रमुख प्रा. सौ. एस. एस. कुलकर्णी व सर्व शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेचे मैदान आखणी, पंच कमिटी व इतर तांत्रिक सुविधांचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**१९) शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय बेस्ट फिजिक (बॉडी बिल्डिंग) स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय बेस्ट फिजिक (बॉडी बिल्डिंग) स्पर्धेचे आयोजन दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन सांगलीचे आशियाई पंच श्री. रामकृष्ण चितळे व भारत श्री. रविंद्र आरते सर यांच्या हस्ते व आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर, सर्व विद्यापीठ निवड समिति सदस्य यांच्या हस्ते फोटो पूजन करून करण्यात आले. स्पर्धेसाठी सपूर्ण शिवाजी विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील एकूण ५६ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यातूनच अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा महिला व पुरुष संघ निवडण्यात आला. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

डॉ. प्रशांत बी. पाटील
क्रीडा विभाग प्रमुख (वरिष्ठ)